# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/०८/२०२४ (मंगळवार) सकाळ**

---

### दरोडा गुन्हयातील फरार आरोपींना बुट्टीबोरी पोलीसांनी केले जेरबंद

पोस्टे अप क्र. ५८३/२३ कलम ३९५, ५०४, ५०६, ३२३ भादंवीचा गुन्हा दिनांक १३/८/२०२३ रोजी पहाटे तीन ते साडेतीन वाजता दरम्यान दाखल असून त्यातील एक वर्षापासून **फरार आरोपी नामे करण सिंग कल्याण सिंग राजपूत वय ३८ वर्ष राहणार सिडको कॉलनी प्लॉट नंबर ८६ सेक्टर जी तालुका हिंगणा जिल्हा नागपूर** यास गुप्त बातमीदाराच्या माहितीवरून दिनांक १२/८/२०२४ रोजी सीडको येथून ताब्यात घेऊन अटक करण्यात आले तसेच त्याचा साथीदार नामे लावीत उर्फ आर्यन बादल खंजर वय ३३ वर्ष, रा. जलनगर खंजर मोहल्ला चंद्रपूर यास वर्धा येथून ताब्यात घेऊन दिनांक १५/८/२०२४ रोजी अटक करण्यात आली त्यांचे पी.सी.आर. दरम्यान यातील आरोपी क्रमांक १ याचे कडून गुन्हा करून पळून जाण्याकरिता वापरलेले मारुती सुझुकी कंपनीची गाडी क्रमांक एम.एच.–४०/ सिए –२४०९ बलेनो किंमत दहा लाख रुपये व जबरीने हिसकावून नेलेले पैशांपैकी नगदी दहा हजार रुपये जप्त करण्यात आले तसेच आरोपी क्रमांक २ याने गुन्हा करून पळून जाण्यासाठी वापरलेले वाहन टोयोटा कंपनीचे फॉर्च्यूनर गाडी क्रमांक एम.एच. १७ एएस ११११२ किंमत पंधरा लाख रुपये असा एकूण २५,१०,०००/– रू चा मुद्देमाल दोन्ही आरोपीतांकडून जप्त करण्यात आला तसेच दिनांक १९/८/२०२४ रोजी त्यांचा पी.सी.आर. संपत असल्याने माननीय न्यायालय समक्ष एम.सी.आर. करिता हजर केले असता माननीय न्यायालयाने मध्यवर्ती कारागृह रवाना केले आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दार सर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री रमेश धुमाळ सर, मा. पोलीस उपअधीक्षक श्रीमती पूजा गायकवाड मॅडम नागपूर विभाग नागपूर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक प्रतापराव भोसले सर, सपोनी सतीश मेश्राम, पीएसआय कुमोदिनी पाथोडे, पोहवा आशिष टेकाम, कुणाल पारधी, प्रवीण देव्हारे, तिलक रामटेके, पो.शी दशरथ घुगरे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर